मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत

# सहायक पोलीस आयुक्त,मिरारोड विभाग.

पत्ता:-मिरारोड पो.ठाणे,दुसरा मजला,बेव्हर्ली पार्क,कनकिया,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे,महाराष्ट्र-४०११०७.
Email Add:- acp.mirard.mb-vv@mahapolice.gov.in

क्र.सपोआ/जाहीरनामा प्रसिध्दी/अ.मृ./१२१२/२०२६ दि.१३.०३.२०२६.

दाखल ता. 13/04/26

वाचले :-

१. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ (१९७४ चा २) च्या कलम २१ तसेच भा.ना.सु.सं.-२०२३ चे कलम १५ मधील तरतूदीनुसार,
२. महाराष्ट्र शासन,गृहविभाग,यांचेकडील अधिसुचना-क्र.पीआरओ-०९२०/प्र.क्र.२१५/विशा-२,दि.११ ऑक्टो.२०२०,
३. महाराष्ट्र शासन,गृहविभाग यांचेकडील सर्वसाधारण क्र.१६१/२०२४ दि.१० सप्टेंबर २०२४.
४. मा.अपर पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय,यांचेकडील क्र.अपोआ/पो.आ.अधि.प्र./१४२/२०२०,दि.१२ नोव्हें.२०२०,
५. मा.पोलीस आयुक्त,मि.भा.व.वि.पो.आयुक्तालय,यांचेकडील क्र.पोआ-मिभाववि/अक.मृत्यु.क्रिप्रोको.१७४/१७८/२३ दि.२६.०५.२०२३.

## -: जाहिरनामा क्र.०९/२०२६ :-

सदर जाहीर नोटीसद्वारे जनतेस आवाहन करण्यात येते की, मिरारोड उपविभागाअंतर्गत काशिमीरा, काशिगांव व मिरारोड पो.ठाणे आहेत. संबधीत पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचेकडून फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७४ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार दाखल अकस्मात मृत्युमधील मयत व्यक्तीच्या मृत्यूच्या दर्शनी कारणांचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

पोलीस ठाण्याकडून फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७४ तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार प्राप्त झालेल्या अकस्मात मृत्युमधील मयत व्यक्तीचे मृत्यूचे कारण दर्शविणारे व चौकशी करणेबाबतचे अधिकार फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७६(२) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १९६ नुसार या कार्यालयास प्राप्त झाले आहेत व त्याबाबत चौकशी सुरू आहे.

दि.२०.०२.२०२६ ते दि.१२.०३.२०२६ दरम्यान इकडील कार्यालयात प्राप्त प्रकरणानुसार मयत इसमांची यादी मृतकांच्या मृत्यूचे कारण व नातेवाईक/खबर देणाऱ्यांच्या नांवासह खालील तक्त्यात नमूद केलेली आहेत.

| क्र. | आ.क्र. | पो.ठाणे | अ.मृ.क्र. | मृतकाचे नांव | वय | मृत्यूचे कारण | नातेवाईक/खबर देणार नांव | मृत्यूचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ६६६ २४.०२.२६ | मिरारोड | ०४/२०२६ | निशांत प्रल्हाद तरखड | ६६ | फुफ्फुसाचे आजाराने | दिपा निशांत तरखड | नैसर्गिक |
| २. | ६६७ २४.०२.२६ | मिरारोड | ४९/२०२५ | रामचंद्र रामनाथ शुक्ला | ९१ | हृदयविकार | शिवम श्रीभगवान पांडे | नैसर्गिक |
| ३. | ७२४ ०४.०३.२६ | मिरारोड | ०३/२०२६ | सनत संतोष गुप्ता | ४७ | उंचावरून पडल्याने दुखापती होऊन | खबर-रत्नाकर भोज राव पत्नी-शकूंतला सनत गुप्ता | अनैसर्गिक |
| ४. | ७४१ ०५.०३.२६ | मिरारोड | ०९/२०२६ | गुड्डू शिवराम उपाध्याय | ४४ | चालत्या ट्रेनमधून पडल्याने दुखापती होऊन | अवधेश दयाराम उपाध्याय | अनैसर्गिक |
| ५. | ७४८ ०५.०३.२६ | मिरारोड | ५५/२०२५ | अशोककुमार लालमन गुप्ता | ३२ | फुफ्फुसाचे आजाराने | पुष्पा देवानंद गुप्ता | नैसर्गिक |
| ६. | ८०७ १२.०३.२६ | मिरारोड | १२/२०२६ | राजेश रत्नाकर शेनॉय | ४८ | हृदयविकार | सुदर्शन आनंद शेरगर | नैसर्गिक |
| ७. | ७४४ ०५.०३.२६ | काशिगांव | ९४/२०२५ | अक्षय शरदराव क्षीरसागर | ३७ | यकृताचा आजार | आशिष रामदास हरणे | नैसर्गिक |
| ८. | ७४६ ०५.०३.२६ | काशिगांव | ७४/२०२५ | अनोळखी पुरुष इसम नांव-गांव माहीत नाही | ५० अंदाजे | अवयव निकामी झाल्याने | नौशाद इस्माईल शेख | नैसर्गिक |
| ९. | ८०४ ११.०३.२६ | काशिगांव | ८६/२०२५ | कमलेशकुमार बसंतीमल कलावंत | ४१ | हृदयविकार व यकृताचे आजाराने | सोनिया क्रिशनकुमार कलावंत | नैसर्गिक |

कृपया मागे पहावे.२/-

मागील पानावरून-

फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ चे कलम १७६(२)(४) तसेच भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १९४ नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन उक्त नमूद मयत इसमांच्या मृत्यूच्या कारणाबाबत मयत व्यक्तीचे मृत्यूचे कारण दर्शविणारे आदेश व चौकशी करणे प्रस्तावित आहे.

तरी संबंधीत मयत इसमांच्या मृत्यूबाबत त्यांचे नातेवाईक,हितसंबंधीत अथवा अन्य कोणासही संशय/तक्रार/हरकत असल्यास याबाबतचे म्हणणे किंवा त्याबाबतचे पुरावे/साक्ष देणेची असल्यास संबंधीतांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसाचे आत सहायक पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,मिरारोड विभाग.पत्ता:-मिरारोड पो.ठाणे इमारत,दुसरा मजला,मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे.पीन-४०११०७ येथे कार्यालयीन वेळेत हजर राहून आपले म्हणणे तोंडी अथवा लेखी स्वरुपात सादर करावे असे आवाहन जाहीर नोटीसद्वारे जनतेस करण्यात येत आहे.

विहीत मुदतीत कोणाच्याही हरकती/तक्रार प्राप्त न झाल्यास या संदर्भात कोणाचीही हरकत नसल्याचे गृहीत धरुन अकस्मात मृत्यू समरी मंजूरीचे आदेश निर्गमीत करण्यात येतील.

(गणपत पिंगळे)
सहायक पोलीस आयुक्त,
मिरारोड विभाग.

प्रति,

१. प्रभारी अधिकारी,
काशिमीरा,मिरारोड,काशिगांव पो.ठाणे
२/-जाहीरनामा पो.ठाणे नोटीस बोर्ड,बीट चौकी,वृत्तपत्र व इतर ठिकाणी प्रसिध्द करुन मृतकाचे आप्तेष्टांना अवगत करावे.

२. तलाठी सजा,
नवघर,घोडबंदर, काशिगांव.
२/- सदर जाहीरनामा आपले कार्यालयाचे नोटीस बोर्ड/दर्शनी भागावर प्रसिध्द करावा.

**प्रत सादर,**

१. मा.उपायुक्त,(मुख्यालय),मिरा-भाईदर महानगरपालिका,भाईदर प. (नोटीस बोर्डवर प्रसिध्दीकरीता)
२. जिल्हा माहीती अधिकारी,ठाणे यांना वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी.
३. कार्यालयीन अधीक्षक,मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांना पोलीस राजपत्रामध्ये प्रसिध्दीसाठी.(ईऑफिस)
४. मिरा-भाईदर महानगरपालीका पत्रकार कक्ष (प्रसिध्दीकरीता)
५. नस्तीकरीता.